महाराष्ट्र शासन

**नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग**

**मध्यवर्ती कार्यालये, पुणे ४११ ००१**

**दूरध्वनी क्र. ०२०-२६१२ २०७६** Email ID: ddtp.ho@maharashtra.gov.in

---

**-: कार्यालयीन आदेश :-**

**विषय : प्रमुख आरेखक संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या नियतकालिक बदल्या - २०२१.**

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार, तसेच सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दि.२९ जुलै, २०२१ अन्वये देण्यात आलेल्या सूचनेनुसार, सार्वजनिक सेवेच्या हितार्थ व प्रशासकीय कारणास्तव, प्रमुख आरेखक संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या बदल्यांबाबत, संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे हे खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करीत आहेत.

**-: आदेश :-**

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नांव व पदनाम | सध्या कार्यरत असलेले कार्यालय | बदलीने पदस्थापनेचे कार्यालय |
|---|---|---|---|
| १ | श्री.लक्ष्मीकांत कमलाकर पाटील, प्रमुख आरेखक | संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे | सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग. (रिक्त पदी) |

०२. श्री.ल.क.पाटील, प्रमुख आरखेक यांना सध्याच्या कार्यालयातून **दि.०५.०८.२०२१ रोजी** (म.ऊ.) कार्यमुक्त करावे व त्यांनी बदली झालेल्या कार्यालयात **दि.०६.०८.२०२१ रोजी** (म.पू.) रुजू व्हावे.

०३. श्री.ल.क.पाटील, प्रमुख आरखेक यांची बदली स्थानिक स्वरुपाची असल्याने, त्यांना नियमानुसार असलेला पदग्रहण अवधी, बदलीप्रवास भत्ता व वेतन अग्रीम अनुज्ञेय नाही.

०४. उपरोक्त नमूद कर्मचारी पदस्थापनेच्या ठिकाणी हजर न झाल्यास वा राजकीय दबाव आणून पदस्थापना बदलण्याचा अथवा रद्द करण्याचा प्रयत्न केल्यास, त्याची संबंधितांच्या गोपनीय अहवालात नोंद घेण्यात येईल. तसेच, राजकीय दबावाची कृती ही महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम ३ (३) व २३ चे उल्लंघन करणारी असल्यामुळे ते गैरवर्तणूक समजून त्यांच्याविरूध्द शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

०५. महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ मधील नियम ३० (सी) नुसार मूळ कार्यालयाने बदलीने पदस्थापना झालेल्या कर्मचाऱ्याचे कोणत्याही प्रकारचे रजेचे अर्ज स्वीकारु नयेत, असे अर्ज प्राप्त झाल्यास ते संबंधित कर्मचाऱ्यांस, त्यांच्या मूळ पत्त्यावर नोंदणीकृत देय डाकेने परत करावेत.

०६. या आदेशान्वये संबंधित कर्मचाऱ्यांनी बदलीने पदस्थापनेच्या ठिकाणी कार्यभार स्विकारताच याबाबत संचालनालयास तात्काळ अवगत करण्यात यावे.

०७. प्रस्तुत आदेश या संचालनालयाचे www.dtp.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर देखील प्रसिद्ध करण्यात यावेत.

(मसुदा मा.संचालकांनी मंजूर केला असे.)

जा.क्र.आस्था/नियतकालीक बदल्या-२०२१/प्रशा-१/३८२८
मध्यवर्ती कार्यालये, पुणे -४११ ००१
दिनांक : ०५ ऑगस्ट, २०२१.

05/08/2021

[ वि.ल.वाघमोडे ]
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे

**प्रत माहितीस्तव :**

१. मा.प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, नवि-२७, मंत्रालय, मुंबई.
२. मा. महालेखापाल, मुंबई-१ / नागपूर-२.

**प्रत माहिती व पुढील कार्यवाहीस्तव :**

१. सहसंचालक, नगर रचना, अंमलबजावणी कक्ष, पुणे / मूल्यांकन, पुणे / पुणे विभाग / नाशिक विभाग / औरंगाबाद विभाग / अमरावती विभाग / नागपूर विभाग / कोकण विभाग.
२. वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे.
३. कार्यासन अधिकारी, प्रशा- १अ / १ ब / लेखा /अर्थसंकल्प, मुख्य कार्यालय,पुणे.
४. श्री.ल.क.पाटील (विहित मार्गाने)
५. मा.संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे / मा.उपसंचालक, नगर रचना, मुख्य कार्यालय, पुणे यांचे स्वीय सहायक
६. वैयक्तिक धारिका.
७. संशोधन अधिकारी, ना.सं.घ./रा.ना.मा.प.

/- प्रस्तुत आदेश संचालनालयाच्या www.dtp.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करावेत.